माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : २५६८/२०२४**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. अनमोल गोपीचंद कावळे, मु.पो. नेरला, ता. पवनी, जि. भंडारा-४४१९०३ | सचिव, ग्राम पंचायत, तारोली, पो. फेगड, ता. कुही, जि. नागपूर | विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, कुही, ता. कुही, जि. नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १५.०६.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०३.१०.२०२४

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.१०.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जाणूनबुजून चूकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कालमर्यादेत सुनावणी घेतली नाही

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जोडपत्र-अ नुसार माहिती देण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर शास्ती व शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०४.०६.२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९.०६.२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०२० ते २०२४ पर्यंत

(४)जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : " (१) ग्रामपंचायत कार्यालय तारोली, पंचायत समिती कुही, जि. नागपूर येथील नमूना -८ (नियम ३२(१) सन २०२३-२०२४ या वर्षासाठी कर आकारणी नोंदवहीच्या एकूण सर्वच्या सर्वच नोंदीच्या प्रती देण्यात यावीत (२) ग्रामपंचायत कार्यालय तारोली

पंचायत समिती कुही येथील सन २०२३-२०२४ या वर्षासाठी करार पात्र असलेल्या संपूर्ण मालमत्ता यांच्या नोंदीच्या संपूर्ण प्रती देण्यात यावेत " इत्यादी एकूण २ मुद्दयांवर माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

४. **प्रथम अपील** —

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १८.०७.२०२४

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २२.०७.२०२४

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अप्राप्त

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १८.०७.२०२४ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १०.०९.२०२४ रोजी सुनावणी घेवून "(अ) अपिलकर्ता यांचे अपील मान्य करण्यात आले. (ब) जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत तारोली यांनी माहितीचे अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपिलकर्त्याने मागितलेली माहिती व ग्रामपंचायतीला उपलब्ध असलेली माहिती जोडपत्र-अ प्रमाणे रजिस्टर पोस्टाद्वारे विनामुल्य देण्यात यावी" असे नमूद करुन आदेश पारीत केले.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा** — आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार अपूर्ण व चूकीची माहिती दिलेली आहे.

त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम पंचायत, तारोली, पो. फेगड, ता. कुही, जि. नागपूर, श्री. रामचंद्र गोरेश्वर बोरसरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, कुही, ता. कुही, जि. नागपूर, श्री. पि. एच. वाभिरकर यांनी स्पष्ट केले की, अपिलकर्ता यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दिनांक १३.०९.२०२४ च्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

६. **निष्कर्ष** :— अपिलकर्ता, श्री. अनमोल गोपीचंद कावळे यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, तारोली, पो. फेगड, ता. कुही, जि. नागपूर यांच्याकडे दिनांक ०४.०६.२०२४ रोजी माहितीसाठी अर्ज केला होता. त्यांच्या या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दिनांक १३.०९.२०२४ च्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणी दरम्यान सांगितले.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांच्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याने प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १५.०६.२०२६

जावक क्रमांक ५६६८ दिनांक 2 JUL 2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर